# जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर

## (महसूल शाखा)

ई-मेल-tahsildarrevahmednagar@gmail.com दूरध्वनी क्र.०२४१-२३४६०२८

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३५०

वाचलेः- १. मा.राज्य परीक्षा समन्वयक तथा अप्पर जमाबंदी आयुक्त आणि अतिरिक्त संचालक, भूमी अभिलेख (महाराष्ट्र राज्य), पुणे यांचेकडील जाहिरात क्र.तलाठी/भरती/प्र.क्र.४५/२०२३, दि.२६/०६/२०२३.

२. मा.राज्य परीक्षा समन्वयक तथा अप्पर जमाबंदी आयुक्त आणि अतिरिक्त संचालक, भूमी अभिलेख (महाराष्ट्र राज्य), पुणे यांचेकडील प्रसिध्दीपत्रक जा.क्र.तलाठी भरती/प्रसिध्दी पत्रक/११२७/२०२३, दि.०६/११/२०२३.

३. मा.सह सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र.तलाठी २०२२/ प्र.क्र.१९०/ई-१०, दि.०४/०१/२०२४.

४. मा. राज्य परीक्षा समन्वयक तथा अपर जमाबंदी आयुक्त आणि अतिरिक्त संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील प्रसिध्दीपत्रक जा.क्र.तलाठी भरती/२०२३/९९/२०२४, दि.११/०३/२०२४.

५. मा.प्र.राज्य परीक्षा समन्वयक तथा अप्पर जमाबंदी आयुक्त आणि अति.संचालक, भुमी अभिलेख, पुणे यांचेकडील पत्र क्र.तलाठी भरती/कावि/१०२/२०२४, दि.१२/०३/२०२४.

६. मा.प्र.राज्य परीक्षा समन्वयक तथा अप्पर जमाबंदी आयुक्त आणि अति.संचालक, भुमी अभिलेख, पुणे यांचेकडील दि.१४/०३/२०२४ रोजीच्या प्रसिध्दीपत्रकानुसार या कार्यालयाने प्रसिध्द केलेली निवड यादी व प्रतिक्षा यादी.

७. कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र.तलाठी-२०२२/प्र.क्र.१९०(भाग-२)/ई-१०, दि.२७/०६/२०२४.

८. मा.सह सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र.तलाठी-२०२२/प्र.क्र.१९०(भाग-२)/ई-१०, दि.११/०७/२०२४.

९. जिल्हा निवड समिती, अहिल्यानगर बैठक दि.२६/०७/२०२४ चे इतिवृत्त.

१०. महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.तलाठी-२०२३/प्र.क्र.०८/ई-१०, दि.१८/०९/२०२३.

११. महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२४/प्र.क्र.२१३/ई-१०, दि.१४/१०/२०२४.

विषयः- ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) पदभरती सन-२०२३ प्रतिक्षायादीतील उमेदवारांना महसूल विभागाच्या अखत्यारितील ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) (गट-क) या संवर्गात नवनियुक्तीने पदस्थापना देणेबाबत...

---

**आदेश**

क्र.मह/आस्था/कार्या.५अ.२/त.भ./२०२५.
अहिल्यानगर.

ज्या अर्थी, मा.अप्पर जमाबंदी आयुक्त आणि अतिरिक्त संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे तथा राज्यस्तरीय नोडल अधिकारी यांचेमार्फत दि.२६/०६/२०२३ रोजी अहिल्यानगर जिल्हा ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) पदभरती सन-२०२३ ची जाहिरात https://mahabhumi.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत आली होती.

आणि ज्या अर्थी, अहिल्यानगर जिल्हा ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) पदभरतीच्या अनुषंगाने दि.१७/०८/२०२३ ते दि.१४/०९/२०२३ या कालावधीत महाराष्ट्रातील विविध परीक्षा केंद्रांवर टीसीएस कंपनीमार्फत ऑनलाईन (Computer Based Test) पध्दतीने घेण्यात आलेल्या परीक्षेची गुणवत्ता यादी, निवड यादी व प्रतिक्षा यादी मा.अप्पर जमाबंदी आयुक्त आणि अतिरिक्त संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे तथा राज्यस्तरीय नोडल अधिकारी यांचेमार्फत उपरोक्त अ.क्र. ५ येथे नमुद पत्रान्वये

इकडेस प्राप्त होऊन उपरोक्त अ.क्र.६ येथे नमुद प्रसिध्दीपत्रकानुसार दि.१४/०३/२०२४ रोजी निवड यादी व प्रतिक्षा यादी https://mahabhumi.gov.in व www.ahmednagar.nic.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली. तसेच दि.०६/०६/२०२४ रोजी जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात येऊन दि.१२/०६/२०२४ व दि.१३/०६/२०२४ या कालावधीमध्ये निवड यादी व प्रतिक्षा यादीतील उमेदवारांच्या मुळ कागदपत्रांची पडताळणी करण्यात आली.

आणि ज्या अर्थी, ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) पदभरती सन-२०२३ चे अनुषंगाने मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे दाखल मुळ अर्ज क्र.४२०/२०२४ व इतर याचिकांमध्ये मा.न्यायाधिकरणाने दि.२४/०६/२०२४ रोजी दिलेल्या निर्देशानुसार कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी उपरोक्त अ.क्र. ७ येथे नमुद पत्रान्वये पेसा क्षेत्रातील पदे वगळता बिगर पेसा क्षेत्रातील पदे भरणेबाबत नियमोचित कार्यवाही करणेस कळविले आहे. तसेच मा.सह सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी उपरोक्त अ.क्र. ८ येथे नमुद पत्रान्वये मुळ अर्ज क्र.१५७/२०२४ प्रमाणे मा.न्यायाधिकरणाचे अंतिम आदेश प्राप्त होईपर्यंत माजी सैनिक प्रवर्गातील पदे भरण्यात येऊ नयेत, माजी सैनिक प्रवर्गातील पदे वगळून ऊर्वरीत पदे भरणेबाबत तात्काळ कार्यवाही करणेबाबत निर्देश दिले आहेत. तथापि, याबाबत मा.उपसचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दि.२६/०७/२०२४ रोजीच्या पत्रान्वये मुळ अर्ज क्र.१५७/२०२४ मध्ये मा.न्यायाधिकरणाने दि.२३/०७/२०२४ रोजी दिलेल्या आदेशानुसार कार्यवाही करणेबाबत निर्देश दिले आहेत.

आणि ज्या अर्थी, उपरोक्त अ.क्र. ६ नुसार प्रसिध्द करण्यात आलेल्या निवड यादीतील कागदपत्र पडताळणी अंती पात्र ठरलेल्या उमेदवारांना ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) पदावर नियुक्ती देणेबाबत दि.२६/०७/२०२४ रोजीच्या जिल्हा निवड समितीच्या बैठकीमध्ये निर्णय घेण्यात आलेला आहे. तसेच समांतर आरक्षणातून निवड झालेल्या उमेदवारांसंदर्भात संबंधित सक्षम प्राधिकारी यांचा पडताळणी अहवाल अनुकूल असल्यास सदरच्या उमेदवारांनाही ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) पदावर नियुक्ती देणेबाबतची कार्यवाही करणेबाबत सदरच्या बैठकीमध्ये निर्णय घेण्यात आलेला आहे.

आणि ज्या अर्थी, उपरोक्त अ.क्र.६ येथे नमुद जाहिर प्रगटनान्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या निवड व प्रतिक्षा यादीतील उमेदवारांपैकी ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) पदावर रुजू होण्यास इच्छुक नसलेल्या, कागदपत्र पडताळणीअंती अपात्र ठरलेल्या व संधी देऊनही कागदपत्र पडताळीस गैरहजर असलेल्या व ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) पदावर रुजू होण्यास इच्छुक नसलेल्या उमेदवारांची निवड रद्द आलेली आहे. तसेच रुजू झालेल्या उमेदवारांपैकी काही उमेदवारांनी ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) पदाचा दिलेला राजीनामा मंजुर करण्यात आलेला आहे.

आणि ज्या अर्थी, उपरोक्त अ.क्र.१० येथे नमुद शासन निर्णयानुसार जिल्हाधिकारी यांना तलाठी संवर्गाचे नियुक्ती प्राधिकारी म्हणुन विहित करण्यात येऊन तलाठी (गट-क) संवर्गाच्या पदावर नियुक्त झालेली व्यक्ती संबंधित जिल्ह्यात बदलीस पात्र राहील अशी तरतुद करण्यात आली. तसेच अ.क्र.११ येथे नमुद शासन निर्णयानुसार महसूल विभागातील तलाठी पदाचे पदनाम बदलून ग्राम महसूल अधिकारी असे करण्यात आले आहे.

त्या अर्थी, मी बाळासाहेब कोळेकर, जिल्हाधिकारी अहिल्यानगर ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) पदावर रुजू होण्यास इच्छुक नसलेल्या, कागदपत्र पडताळणीअंती अपात्र ठरलेल्या, संधी देऊनही कागदपत्र पडताळणीस गैरहजर असलेल्या व राजीनामा दिलेल्या निवड यादी व प्रतिक्षा यादीतील उमेदवारांच्या ऐवजी संबंधित प्रवर्गाच्या प्रतिक्षा यादीतील खालील उमेदवारांना अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयाचे आस्थापनेवरील गट-क मधील ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) या पदावर (वेतनश्रेणी एस-८, २५५००-८११००) खालील तक्त्यामधील रकाना क्र.५ मध्ये दर्शविलेल्या कार्यालयात पुढील अटी व शर्तीच्या अधीन राहुन निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देत आहे.

| अ.क्र. | प्रतिक्षा यादीतील उमेदवाराचे नाव | मुळ प्रवर्ग | नियुक्तीचा प्रवर्ग | ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) संवर्गात नियुक्तीने देण्यात आलेली पदस्थापना |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | SHINDE PRATIK SANJAY | OBC | General | रुई, ता.राहाता |
| २. | DATTARAM DIGAMBAR PAWAR | Open | General | माही, ता.कर्जत |
| ३. | DIPALI ABASAHEB SHINGADE | NT-C | General - LDS | कुरुंद, ता.पारनेर |
| ४. | SONALI KISAN KATKAR | NT-C | General - LDS | केलवड बु., ता.राहाता |
| ५. | MADHURI UTTAM SAUDAGAR | EWS | General - LDS | शेडगांव, ता.श्रीगोंदा |
| ६. | VAIBHAV GORKHNATH WAKCHAURE | Open | General | ----------------------- |

| अ.क्र. | प्रतिक्षा यादीतील उमेदवाराचे नाव | मुळ प्रवर्ग | नियुक्तीचा प्रवर्ग | ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) संवर्गात नियुक्तीने देण्यात आलेली पदस्थापना |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| ७. | VIKRAMSING HIRCHAND BRAMHANAT | General - SP | General - SP | खरवंडी कासार, ता.पाथर्डी |
| ८. | PRAFULL TUKARAM GHOLAP | OBC | General - EX | मिरी, ता.पाथर्डी |
| ९. | URMUDE VAIBHAV DAGADU | OBC | General - EX | टाकळी ढोकेश्वर, ता.पारनेर |
| १०. | LAKHAN PANDURANG KHATANE | OBC | General - PA | जातेगांव, ता.जामखेड |
| ११. | SACHIN BHARAT BORKAR | SC | SC | आंबी दुमाला, ता.संगमनेर |
| १२. | MADHURI DNYANESHWAR SONAWANE | SC | SC - LDS | पळसखेडे, ता.संगमनेर |
| १३. | RAHUL GYANU RAUT | SC | SC - EX | भेंडा बु., ता.नेवासा |
| १४. | VISHAL DATTU BHANGARE | ST | ST | गर्दणी, ता.अकोले |
| १५. | SWARAJ KISAN CHAVAN | ST | ST -Against-PT | निंबे, ता.शेवगांव |
| १६. | HANAMANT KENCHAPPA NILE | NT-C | NT-C | वनकुटे, ता.पारनेर |
| १७. | VAISHNAVI VISHNU KEDAR | NT-D | NT-D - LDS | वडुले बु., ता.शेवगांव |
| १८. | RAMESH DINKAR RINDHE | OBC | Divyang - a)-OBC | भानसहिवरे, ता.नेवासा |
| १९. | ASHWINI SUDAM GADE | OBC | OBC - LDS | कोळपेवाडी, ता.कोपरगांव |
| २०. | OMPRAKASH GOVIND GADEKAR | OBC | OBC - EA | आश्वी खु., ता.संगमनेर |
| २१. | MUNNALAL FULCHAND MESHRAM | OBC | OBC - PT | शेडगांव, ता.संगमनेर |
| २२. | HARIHAR VASUDEO HUMBE | EWS | EWS | रातंजन, ता.कर्जत |
| २३. | PRASAD BAPUSAHEB SHETE | EWS | EWS | चिंचोली, ता.राहुरी |
| २४. | PRACHI KANIFNATH AKOLKAR | EWS | EWS - LDS | लोहसर, ता.पाथर्डी |
| २५. | SANIKA SUNIL MANE | EWS | EWS - PA | फक्राबाद, ता.जामखेड |

<u>अटी व शर्ती</u> –

१. संबंधित उमेदवारांची नियुक्ती मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण मुंबई, खंडपीठ मुंबई यांचेकडील मूळ अर्ज क्रमांक ४२०/२०२४, ४७८/२०२४, १५७/२०२४, ३८८/२०२४ व ४७४/२०२४ या प्रकरणी होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून तसेच मा. सर्वोच्च न्यायालयात अनुसूचित क्षेत्रातील (पेसा कायदा लागू) १७ संवर्गातील सरळसेवा पद भरती अनुषंगाने दाखल एस.एल.पी.याचिका क्रमांक २२१०९/२०२३ मधील निर्णयास अधिन राहून करण्यात येत आहे.

२. वरील उमेदवारांना दिलेली नियुक्ती ही पूर्णत: तात्पुरत्या व अस्थायी स्वरुपाची असून ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) पदासाठीची अर्हता तसेच त्यांनी या कार्यालयास सादर केलेल्या आवश्यक अभिलेखाच्या सत्यतेच्या अधीन राहून निवड करण्यात आलेली आहे. सदर कागदपत्र बनावट, खोटे असल्याचे आढळून आल्यास त्यांची सेवा पूर्व सूचना न देता किंवा कोणतेही कारण न दर्शविता समाप्त करण्याचे नियुक्ती प्राधिकाऱ्याचे अधिकार अबाधित राहतील. तसेच भविष्यात पदे कमी झाल्यास अगर इतर कारणास्तव त्यांची सेवा समाप्त केल्यास त्यांचा या पदावरील नेमणूकीसंबंधीचा कोणताही हक्क राहणार नाही.

३. उमेदवारांनी या आदेशाचे दिनांकापासून ३० (तीस) दिवसांचे आत त्यांना नेमून दिलेल्या पदावर रुजू होणे आवश्यक आहे. जर ते विहीत मुदतीत सदर पदस्थापनेच्या पदावर रुजू झाले नाहीत, तर त्यांची नियुक्ती रद्द करणेत येईल. याबाबत अपवादात्मक परिस्थितीत, महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली २०२१, दि.२१/०६/२०२१ मधील नियम २ (ड) नुसार विचार करणेत येईल.

४. नियुक्तीचे कार्यालयात हजर होण्यापूर्वी ते अन्यत्र नोकरी करीत असल्यास त्या पदाचा राजीनामा देणे व सक्षम प्राधिकाऱ्याने राजीनामा स्विकृत केल्याबाबतचे आदेश / पत्र रुजू अहवाला सोबत सादर करणे आवश्यक आहे. सदर आदेश / पत्र सादर केल्याशिवाय सदर पदावर रुजू होता येणार नाही. अशा उमेदवारास रुजू करून घेण्यापूर्वी सर्व आवश्यक कागदपत्र प्राप्त करून घेण्याची जबाबदारी कार्यालय प्रमुखांची राहील.

५. उमेदवाराची जन्मतारखेची नोंद जन्म दाखला / शाळा सोडल्याचा दाखला / शालांत प्रमाणपत्रावरून उमेदवारांच्या सेवा पुस्तकात घेण्यात येईल. त्यामुळे रूजू झालेपासून ३० दिवसांचे आत उमेदवाराने जन्माचा दाखला / शाळा सोडल्याचा दाखला व पदवी प्रमाणपत्र, वय, जात प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र इत्यादी प्रमाणपत्रांच्या साक्षांकीत प्रती नेमणूकीच्या कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे.

६. प्रस्तुत पदावर रुजु झालेचे दिनांकापासुन ३ महिन्याचे आत त्यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणुक) नियम १९७९ मधील नियम १९ आणि शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.सी.आर.१०७९/२०५९/ २२३/११, दिनांक २०/११/१९८० व शासन निर्णय दिनांक ०२/०६/२०१४ अनुसार विहित केलेले मत्ता आणि दायित्व (Assets and liabilities) याबाबतचे विवरणपत्र भरुन सादर करावे.

७. वरील उमेदवाराने रुजु होतेवेळी घटनेतील तरतुदीनुसार भारतीय संघराज्याशी एकनिष्ठ राहणेबाबतची शपथ घ्यावी लागेल.

८. सदर पदावर रूजू झालेचे दिनांकापासुन दोन महिन्यांचे आत जिल्हा शल्यचिकित्सक, अहिल्यानगर यांचेकडील शारिरीकदृष्टया पात्रतेसंबंधीचे वैद्यकीय प्रमाणपत्र हजर केले पाहिजे. सदर अहवाल प्रतिकूल आल्यास संबंधीत उमेदवारांना सेवेतून कमी करण्यात येईल.

९. उमेदवारांस त्यांची नेमणूक / नोकरी सोडावयाची झाल्यास तशी आगावू सुचना देऊन राजीनामा मंजूर करुन घ्यावा. त्यांनी तशी आगावू सुचना न दिल्यास त्यांचेकडुन १ महिन्याचे वेतन वसूल करण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिकारी यांना राहतील.

१०. उमेदवारास हजर करून घेण्यापुर्वी वरील अ.क्र.१ येथे नमुद अटीची नोंद घेतलेबाबत संबंधित कार्यालयप्रमुख यांनी संबंधित उमेदवाराकडून लेखी प्रतिज्ञापत्र दोन प्रतीत करून घ्यावे व एक प्रत या कार्यालयाकडे न चुकता सादर करावी.

११. नियुक्ती अधिका-यांच्या कार्यक्षेत्रातील कोणत्याही कार्यालयात बदली करण्यात येईल.

१२. प्रस्तुत नेमणूकीचे पदावर रुजू होणेसाठी प्रवासभत्ता व एस.टी.भाडे अनुज्ञेय राहणार नाही.

१३. सदरची नियुक्ती पूर्व चारित्र्य, वैद्यकीय पडताळणी अहवालावर अवलंबून असून आक्षेपार्ह अहवाल असल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता त्यांना नोकरीतून काढून टाकणेत येईल.

१४. उमेदवारांना शासन सेवेत रुजू होतांना शासन निर्णय राजकीय सेवा विभाग क्र.१५८१/१४, दि.०९/०८/१९७९ मध्ये विहित केल्यानुसार वचन लिहून द्यावे लागेल.

१५. शासन सेवेत रुजू होतेवेळी शैक्षणिक अर्हता, जातीचे प्रमाणपत्र व इतर प्रमाणपत्राच्या मुळ प्रती सादर कराव्यात. शासन निर्णय क्र.बीसीसी.२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब, दि.१२/१२/२०११ नुसार ज्या उमेदवारास विशिष्ट मागास प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागेवर नियुक्ती दिलेली आहे, अशा उमेदवारास, त्याच्या जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्याच्या अधीन राहून तात्पुरती नियुक्ती देण्यात येत आहे. सदरहू उमेदवाराकडे जात पडताळणी समितीकडून प्राप्त करून घेतलेले जात वैधता प्रमाणपत्र असल्यास त्याने नियुक्ती आदेशान्वये हजर होताना ते सादर करावे. नसल्यास, सदर उमेदवाराने जात प्रमाणपत्र पडताळणीसाठी आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे / प्रमाणपत्रे या कार्यालयास तात्काळ सादर करणे आवश्यक आहे. विहीत मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर करू न शकल्यास सदर उमेदवारास कोणतीही पूर्वसूचना न देता सेवा समाप्त करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

१६. महाराष्ट्र नागरी सेवा नियमावली व शासनाने वेळोवेळी केलेले नियम त्यांचेवर बंधनकारक राहतील. तसेच ते ज्ञात करून घेण्याची व अनुपालन करण्याचे उत्तरदायित्व उपरोक्त कर्मचारी यांचेवर असेल.

१७. महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ मधील प्रतिज्ञापत्र नमुना-अ (नमुना नियम ४) मध्ये भरुन दिलेले प्रतिज्ञापत्र चुकीचे असल्याचे निदर्शनास आल्यास व त्यानंतर सदर नियमातील तरतुदीनुसार नियुक्त उमेदवार अपात्र असल्याचे निदर्शनास आल्यास निवड व नेमणुक रद्द करून नियमोचित कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

१८. उपरोक्त उमेदवारांस चारित्र्य व पूर्व चारित्र्य पडताळणीच्या अधिन राहुन निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदस्थापना देण्यात येत आहे. तसेच संबंधित कार्यालय प्रमुख यांनी महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.चापअ-१००१/प्र.क्र.११०/२००१/१६-अ, दि.२६/११/२००२ नुसार उपरोक्त उमेदवारांस रुजू करून घेतेवेळी त्यांचेकडून उक्त शासन परिपत्रकान्वये विहित केलेला साक्षांकन नमुना भरून घ्यावा. सदर साक्षांकन नमुना भरुन दिलेनंतरच सदर उमेदवारांना रुजू करून घ्यावे. तसेच नियुक्ती देण्यात आलेल्या उमेदवारांची पोलीस विभागाकडून चारित्र्य व पुर्व चारित्र्य पडताळणी संबंधित कार्यालय प्रमुखांनी करून घ्यावी. सदर अहवाल प्रतिकूल असल्यास, कार्यालयप्रमुख यांनी शासन परिपत्रक दिनांक २६/०८/२०१४ अन्वये कार्यवाही करणे आवश्यक राहील.

१९. ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) पदावर नियुक्त होणाऱ्या उमेदवाराकडे शासनाने अधिकृत केलेली संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण नसल्यास, नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून दोन वर्षांच्या आत उमेदवाराने माहिती तंत्रज्ञान संचालनालय महाराष्ट्र शासन यांचेकडून शासन सेवेतील गट क संबंधीत पदाकरिता महाराष्ट्र नागरी सेवा ( संगणक हाताळणी व वापराबाबतचे ज्ञान आवश्यक ठरविण्याबाबत ) नियम १९९९ च्या नियम ३ अन्वये संगणक ज्ञानाच्या अर्हतेचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. या विहीत कालावधीत उमेदवाराने सदर प्रमाणपत्र सादर न केल्यास सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील अधिसूचना क्रमांक एसआरव्ही/प्र.क्र.४६२/का. १२, दिनांक २८/०५/२०१८ अन्वये कार्यवाही करण्यांत येईल.

२०. मा. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक अंनियो-१००५/१२६/सेवा-४, दिनांक ३१/१०/२००५ नुसार उमेदवारांना नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना (Defined Contribution Pension Scheme) लागू राहील. मा. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक अंनियो-२०१२/प्र.क्र.९६/सेवा-४, दिनांक २७/०८/२०१४ नुसार नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना (Defined Contribution Pension Scheme) केंद्राच्या राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेत ( National Pension Scheme ) समाविष्ट करणेत आलेली आहे.सदर उमेदवारांना सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती वेतन योजना म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण) नियम, १९८४ योजना लागू राहणार नाही. या संदर्भात भविष्यात शासनाचे काही निर्देश अगर सूचना प्राप्त झाल्यास ते सदर उमेदवार यांचेवर बंधनकारक राहतील.

२१. ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) पदावर रुजू झालेनंतर, रूजू दिनांकापासून चार वर्षात व तीन संधीत महसूल विभागाची विभागीय दुय्यम सेवा परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक आहे. तद्नंतर सदर परीक्षा उत्तीर्ण होईपावेतो त्यांना वार्षिक वेतनवाढ देय राहणार नाही. तसेच सदर उमेदवारांना त्यांची मूळ सेवाज्येष्ठता गमवावी लागेल.

२२. ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) पदावर रुजू झालेनंतर, रूजू दिनांकापासून नऊ वर्षात व तीन संधीत महसूल विभागाची महसूल अर्हता परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक आहे. विहीत मुदतीत महसूल अर्हता परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास पदोन्नतीसाठी विचार केला जाणार नाही.

२३. हिंदी व मराठी भाषा परीक्षेसंबंधी केलेल्या नियमानुसार जर शिफारस प्राप्त उमेदवार अगोदर परीक्षा उत्तीर्ण झाला नसेल किंवा त्यास सदरहू परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर, सदरहू उमेदवारांना ती परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

२४. महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.तलाठी-२०२४/प्र.क्र.८१/ई-१०, दि.०३/०९/२०२४ अन्वये ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) पदावर प्रथम नियुक्ती देणेपूर्वी ३ महिन्यांचे प्रशिक्षण देण्याबाबत नमूद केलेले आहे. नवनियुक्त ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) जोपर्यंत पायाभूत प्रशिक्षण पूर्ण करीत नाहीत, तोपर्यंत त्यांना नियमित पदस्थापना न देता परिविक्षाधीन कर्मचारी म्हणून समजणेत येईल.

२५. महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.महिआ-२०२३/प्र.क्र.१२३/कार्या-२, दि.०४/०५/२०२३ नुसार खुल्या गटातील महिलांकरीता आरक्षित असलेल्या पदावर निवडीकरीता नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्राची अट रद्द करण्यात आलेली आहे. तसेच अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळता अन्य मागास प्रवर्गातील महिलांकरीता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीसाठी दावा करू इच्छिणा-या महिलांना त्या-त्या मागास प्रवर्गासाठी इतर मागास व बहुजन कल्याण विभाग तसेच सामान्य प्रशासन विभागाकडून वेळोवेळी विहित करण्यात आल्याप्रमाणे महिला उमेदवारांनी सन-२०२३/२४ या कालावधीचे दि.३१/०३/२०२४ पर्यंत वैध असलेले उन्नत व प्रगत व्यक्ती गट (क्रिमीलेअर) यामध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम प्राधिकारी यांनी निर्गमित केलेले नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करण्याची अट सक्षम प्राधिकरणाचे पडताळणीच्या अधिन असेल.

२६. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दि.१२/०२/२०१९ व दि.३१/०५/२०२१ अन्वये आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील (ईडब्ल्युएस) उमेदवारांकरीता विहित केलेले प्रमाणपत्र सादर करण्याची अट सक्षम प्राधिकरणाचे पडताळणीच्या अधिन असेल.

२७. उमेदवाराची नियुक्ती कोणत्याही प्रशासकीय न्यायाधिकरण व न्यायालयातील आदेशाच्या अंमलबजावणीस अधिन राहील. तसेच भरती प्रक्रियेच्या अनुषंगाने भविष्यात काही न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास मा.न्यायालयाचा निर्णय सर्व संबंधितास बंधनकारक राहील.

२८. अनाथ प्रवर्गाच्या उमेदवाराची नियुक्ती मा.आयुक्त, महिला व बालविकास, पुणे यांचे पडताळणी अहवालावर अवलंबून असून आक्षेपार्ह अहवाल असल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता त्यांना नोकरीतून काढून टाकणेत येईल.

२९. बायोमेट्रीक पडताळणीस गैरहजर असलेल्या उमेदवारांची नियुक्ती भविष्यातील संभाव्य बायोमेट्रीक पडताळणीच्या अधिन असेल.

Signed by
Balasaheb Bapurao Kolekar
Date: 06-03-2025 13:53:26
जिल्हाधिकारी अहिल्यानगर.

प्रति,
संबंधित उमेदवार

प्रत - मा.राज्य परीक्षा समन्वयक तथा अप्पर जमाबंदी आयुक्त आणि अतिरिक्त संचालक, भूमी अभिलेख (महाराष्ट्र राज्य), पुणे यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर.

प्रत - सह सचिव (ई-१०), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर.

प्रत - मा.विभागीय आयुक्त, नाशिक विभाग नाशिक यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर.

प्रत - उपविभागीय अधिकारी, संगमनेर/शिर्डी/श्रीरामपूर/अहिल्यानगर/पाथर्डी/श्रीगोंदा-पारनेर/कर्जत यांचेकडेस आवश्यक कार्यवाहीस्तव.

प्रत -तहसिलदार, अकोले/संगमनेर/कोपरगांव/राहाता/श्रीरामपूर/राहुरी/अहिल्यानगर/नेवासा/पाथर्डी/शेवगांव/ श्रीगोंदा/पारनेर /कर्जत/ जामखेड यांचेकडेस पुढील उचित कार्यवाहीस्तव.

२/- पदस्थापना दिलेल्या पदावर रूजू झालेल्या उमेदवाराचा रूजू अहवाल संबंधीत कार्यालय प्रमुख / तहसिलदार यांनी या कार्यालयास उलटटपाली सादर करावा.

प्रत - जिल्हा कोषागार अधिकारी, अहिल्यानगर / उपकोषागार अधिकारी, अकोले/संगमनेर/कोपरगांव/राहाता/श्रीरामपूर/ राहुरी/नेवासा/पाथर्डी/शेवगांव/श्रीगोंदा/पारनेर/कर्जत/जामखेड यांचेकडेस पुढील उचित कार्यवाहीस्तव.